# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ


**डॉ. एस. एम. रोकडे**
संचालक (प्रभारी.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२१६५५४, २२३१०४ फॅक्स : ०७१३२.२२२६५१
**Email :** bcud.gondwanaunivesity@ gmail.com
**web:**gondwana.digitaluniversity.ac
**web:**www.unigug.org


क्रमांक/गो.वि./४८३/२०१६

दिनांक : ०५ / ०१ /२०१६

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय:– बोगस विद्यापीठामध्ये प्रवेश घेणे /पदव्या घेणे याबाबत विद्यार्थ्यांना परावृत्त करणे बाबत.**

**संदर्भ:–** १. विद्यापीठ अनुदान आयोगाचे दि. ०५.१०.२०१५ चे पत्र.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१५/प्र.क्र. ४४७/विशि–३, दि. ३०.११.२०१५.

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये कळविण्यात येते कि, विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या सुरवातीला बोगस विद्यापीठाची यादी दरवर्षी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. बोगस विद्यापीठे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्याचे उल्लघंन करून कार्यवाही करतात. ''विद्यापीठ'' या शब्दाचा वापर करून किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्यानुसार विद्यापीठाच्या परिनियमाशिवाय विद्यार्थ्यांना पदव्या देवून विद्यार्थ्यांची फसवणूक करतात. ही बाब गंभीर व देशातील तरूणांशी सबंधित असल्याने बोगस विद्यापीठातून विद्यार्थ्यांना प्रवेश/पदवी घेण्यास परावृत्त करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या विद्यापीठाची यादि महाविद्यालयात प्रसिद्ध करून विद्यार्थ्यांना माहिती करून द्यावी तसेच विद्यार्थ्यांना बोगस विद्यापीठामध्ये प्रवेश / पदवी घेण्यापासून परावृत्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन करावे. बोगस विद्यापीठे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्याच्या उल्लघंन करून किंवा ''विद्यापीठ'' हा शब्द वापरून विद्यार्थ्यांची पदवी प्रदान करून विद्यार्थ्यांची फसवनूक करत असल्याचे निर्दशनास आल्यास त्याबाबत कायदेशीर कार्यवाही करावी. संदर्भीय पत्रानुसार महाविद्यालयाने योग्य ती कार्यवाही करावी.

सधन्यवाद.

संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली (म.रा.)

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 6021 दिनांक 29/12/15
जावक क्र. 3085 दिनांक 31/12/15

**बोगस विद्यापीठामध्ये प्रवेश घेणे/पदव्या घेणे याबाबत विद्यार्थ्यांना परावृत्त करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण२०१५/ प्र.क्र.४४७/विशि-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि. ३०/११/२०१५.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
आवक क्र. 1999 दिनांक 31/12/15
जावक क्र. .............. दिनांक ..............

**वाचा :-** विद्यापीठ अनुदान आयोगाचे दि. ५/१०/२०१५ चे पत्र.

**प्रस्तावना** :- विद्यापीठ अनुदान आयोग दरवर्षी शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या सुरवातीला बोगस विद्यापीठाची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. बोगस विद्यापीठे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्याच्या उल्लघंन करुन कार्यवाही करतात. "विद्यापीठ" या शब्दाचा वापर करुन किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्यानुसार विद्यापीठाच्या परिनियमाशिवाय विद्यार्थ्यांना पदव्या देऊन विद्यार्थ्यांची फसवणूक करतात. ही बाब गंभीर व देशातील तरुणांशी संबंधित असल्याने बोगस विद्यापीठातून विद्यार्थ्यांना प्रवेश/पदवी घेण्यास परावृत्त करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग दरवर्षी शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या सुरवातीला बोगस विद्यापीठाची यादी प्रसिध्द करते.

अशी यादी शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी जाहीर करावी. व त्याबाबत विद्यार्थ्यांना जाणीव करुन दयावी बोगस विद्यापीठे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्याने उल्लघंन करुन किंवा "विद्यापीठ" हा शब्द वापरुन विद्यार्थांना पदवी प्रदान करुन विद्यार्थ्यांची फसवणूक करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत कायदेशीर कार्यवाही करावी.

विद्यार्थ्यांना बोगस विद्यापीठामध्ये प्रवेश/पदवी घेण्यापासून परावृत्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन करावे.

यासूचना आपल्या अधिपत्याखालील महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सिध्दार्थ खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. कुलपतींचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. कुलगुरू, सर्व अकृषी विद्यापीठे
कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
सहसचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे स्वीय सहाय्यक
अवर सचिव (साशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
कक्ष अधिकारी (विशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
निवडनस्ती (विशि-३)

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली